# वाहतुक सुलभता

वाहतुक सुलभता

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आता वाहतूक शिस्तीचे धडे

## एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र कमिटी ▮ वाहतूक पोलिसांचा उपक्रम

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – विद्यार्थ्यांनी, विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांमार्फत वाहतूक शिस्तीचे धडे देण्यासाठी शहरातील महाविद्यालयांत स्वतंत्र वाहतूक कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. कमिटीमध्ये महाविद्यालयातील एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे. यासाठी शहर वाहतूक पोलिसांनी पुढाकार घेतला असून, याला महाविद्यालयांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

शहरात दिवसेंदिवस वाहन संख्या वाढत असून, सद्य:स्थितीत शहरातील वाहनसंख्या ३८ लाखांवर आहे. परिणामी ठिकठिकाणी कोंडीचे चित्र पाहण्यास मिळत आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक शिस्तीसाठी वाहतूक पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येत असून, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षिततेचे धडे देण्यात येत आहेत. मागील आठवडाभरात शहरातील मॉडर्न, फर्ग्युसन, यशवंतराव चव्हाण, एमएमसीसी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अशा सुमारे ८ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे. तर, येत्या दोन महिन्यांत शहरासह, पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे १९७ महाविद्यालयांत हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमावेळी महाविद्यालय प्रशासनाशी चर्चा करून महाविद्यालयातील एनएसएस आणि एनसीसी विद्यार्थ्यांचा समावेश असलेली एक वाहतूक कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. १२ जणांची ही कमिटी असणार आहे. कमिटीतील विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय परिसरात वाहतूक शिस्तीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच, कॉलेज परिसरातील रस्ते, चौक आदी ठिकाणी विद्यार्थी रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देणार आहेत. यासाठी आजवर कार्यक्रम घेण्यात आलेल्या सर्व महाविद्यालय प्रशासनाने प्रतिसाद दिला असून, कमिटी स्थापन करण्याचे ठरवले आहे.




वाढती वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पोलिसांबरोबरच तरुणाईचा पुढाकार गरजेचा असल्याने पोलिसांकडून महाविद्यालयांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. यासाठी पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक यांच्यासह वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कमिटी स्थापन करण्याबरोबरच विद्यापीठ स्तरावर चित्रकला, पथनाट्याचे कार्यक्रम, वाहतूक चिन्हांचे बोर्ड, जिवंत देखावे, गुड सॅमिरिटन कायद्याविषयी जनजागृती, पोलीस मित्रमंडळाची स्थापना करण्यात येणार असल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले.

> वाहतूक शिस्तीसाठी विद्यार्थ्यांचा सहभाग गरजेचा आहे. गेल्या आठवड्यात शहरातील फर्ग्युसन, मॉडर्नसह सुमारे आठ महाविद्यालयांत रस्ता सुरक्षेविषयी कार्यक्रम घेण्यात आला आहे. तर, पुढील दिवसात इतर महाविद्यालयात घेण्यात येईल. महाविद्यालय प्रशासनाच्या मदतीने विद्यालयातील एनसीसी आणि एनएसएस यांचा समावेश असलेली वाहतूक कमिटी स्थापन करण्यात येणार आहे.
>
> ▮ **पंकज देशमुख**, वाहतूक पोलीस उपायुक्त.

> महाविद्यालयात एनएसएसच्या ७५ विद्यार्थ्यांचा पोलीस मित्र गट कार्यरत असून, विविध कामे केली जातात. येत्या काळात वाहतूक पोलिसांच्या मदतीने वाहतूक कमिटी स्थापन करून वाहतूक शिस्तीबाबत प्रयत्न करण्यात येणार आहेत.
>
> ▮ **डॉ. संतोष फरांदे**, एनएसएस कार्यक्रम अधिकारी, फर्ग्युसन महाविद्यालय

# नागरिकांना रस्त्यांची माहिती 'लाईव्ह' मिळणार

## पोलिसांकडून 'ट्रॅफवॉच' नावाचे संकेतस्थळ

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – शहरातील नागरिकांना शहरांतर्गत प्रवास करणे सोपे जावे, या हेतूने वाहतूक विभागाने 'पुणे ट्रॅफवॉच' नावाचे संकेतस्थळ सुरू केले असून, यामुळे नागरिकांना रस्त्याची सद्यपरिस्थिती, पार्किंगसाठीची जागा, साईनबोर्ड आदींबाबत माहिती मिळणार आहे. यामुळे प्रवास करणे सुलभ होईल, असा विश्वास वाहतूक पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

पुणे शहर वाहतूक विभाग, चेंजभाई आणि स्मार्ट सिटीच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'पुणे ट्रॅफवॉच' या संकेतस्थळाचे शनिवारी उद्घाटन करण्यात आले. यावेळी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. संकेतस्थळासाठी चेंजभाई या संस्थेने विशेष काम केले आहे. संकेतस्थळावर 'फोटो ऑटो टॅगिंग' असणारा देशातील हा पहिला प्रकल्प असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

शहरातील नागरिकांना 'ट्रॅफवॉच'द्वारे सुमारे ३३ हजार फोटोंच्या माध्यमातून प्रमुख ४७ रस्ते आणि २६५ चौकांची माहिती मिळणार आहे. नागरिकांनी संकेतस्थळावर एखाद्या रस्त्याचे नाव टाकल्यास त्यांना त्या रस्त्यावरील वाहतुकीचे 'करंट स्टेटस', खड्डे, सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, पार्किंगचे नियम, बीआरटी लेन, साईनबोर्ड, तुटलेले फुटपाथ, सम-विषम पार्किंग, नो-एन्ट्री, नो-पार्किंग आदी तपशील पाहता येणार आहेत. यासह वाहतूक नियमांचे उल्लंघन होणारे चौक, वॉटर लॉगिंग आदी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

### 'ब्लॅकस्पॉट' एका क्लिकवर

सुरळीत वाहतुकीसाठी वाहतूक शाखेने शहरात विविध नियम ठरवून दिलेले आहेत. यात नो पार्किंग झोन, नो एंट्री, वन -वे मार्ग आदींचा समावेश असून, याची सर्व अद्ययावत माहिती या संकेतस्थळावर अपडेट करण्यात आली आहे. यामध्ये ब्लॅकस्पॉटची माहिती असून, एका क्लिकवर नागरिकांना ब्लॅकस्पॉटची यादी दिसणार आहे.

> पालखी मार्गाची माहिती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'वेबपेज'प्रमाणे 'पुणे ट्रॅफवॉच'ची संकल्पना राबविण्यात येणार आहे. 'पुणे ट्रॅफवॉच'वर 'रिअल टाईम अपडेट' असल्याने नागरिकांसाठी ही संकल्पना फायदेशीर ठरणार आहे. नागरिकांना या माध्यमातून रस्त्यावरची परिस्थिती पाहता येणार आहे.
>
> पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतूक

**PuneMirror** - 31 July, 2019

# Traffic dept ropes in NCC, NSS volunteers to man congestions

**They were made aware of helmet rules, fines and role of Good Samaritan; group of 12 pupils to assist cops to formulate plans**

Supriya.Dedgaonkar
@timesgroup.com
TWEETS @ThePuneMirror

In a bid to ensure that the new generation has the right approach towards road safety and traffic rules, the city traffic department is now conducting road safety sessions in colleges. Starting last week, they have also roped in volunteers from National Cadet Corps (NCC) and National Social Service (NSS) wings, who will work as student traffic wardens in their college vicinities in their drive.

These students from several colleges will form a committee comprising around 12 students who will be closely working with the traffic department to formulate plans to make the traffic scenario better in the city.

Rajesh Puranik, a police inspector from the counselling department, speaking to *Mirror*, said, "It is extremely essential that students at college levels are counselled with key facts about traffic and the impact not following traffic rules can have on their lives. We thought that it would be a good idea to involve students in this initiative as these young minds can pass on the message to several others."

So far, while the traffic department has conducted awareness programmes in Fergusson College, Modern College and Yashwantrao Chavan College, they will soon cover other colleges in Pune Municipal Corporation's (PMC's) ambit as well as those under Pimpri-Chinchwad Municipal Corporation (PCMC) limits.

Santosh Pharande, head of NCC wing at Fergusson College, told *Mirror*, "We already have students working as 'police mitra'. The presentations conducted by the traffic department authorities have sparked the interests of the students and many have come forward to volunteer.

Supriya Nene, principal, Modern College of Architecture, added, "Students are generally aware of traffic laws; however, there is some kind of reluctance in following the same. The sessions will help them understand the new additions in the rules."

In the sessions, students are told about the importance of helmet, role of a Good Samaritan and fines to be paid on violation of traffic norms. To make the learning a fun activity, traffic cops have also organised several street plays, poster-making competitions and aim to include them in traffic-related surveys.

Tushar Shinde, a student from Fergusson College, speaking about the initiative, said, "At present, the department is understaffed and will do good with students coming forward to lend support; however, the best part is that these lessons will stay with us for life and we will never break the rules."

FILE PHOTO



Pupils will volunteer as traffic wardens and say that they are happy to assist

**लोकसत्ता** – दि. २० जुलै, २०१९





# नियम पाळणाऱ्या १५ हजार वाहनचालकांना 'आभार कुपन'

प्रतिनिधी, पुणे

**वाहतुकीचे नियम** पाळणाऱ्या तसेच नियमभंगाचा कोणताही दंड प्रलंबित नसलेल्या शहरातील १५ हजार वाहनचालकांना वाहतूक पोलिसांकडून आभार कुपन भेट देण्यात आले आहे. या योजनेसाठी वाहतूक पोलिसांनी खास ॲप तयार केले असून शहरातील नामवंत उपाहारगृहचालक, मिठाई विक्रेते, घरपोच खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणारी ॲप आधारित सेवा अशा एकूण मिळून १५० जणांनी पोलिसांच्या योजनेला सहकार्य केले आहे.

वाहतूक पोलिसांकडून दीड महिन्यापूर्वी नियम पाळणाऱ्या वाहनचालकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'आभार योजना' सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत नियम पाळणाऱ्या वाहनचालकांना शहरातील विविध उपाहारगृहे, घरपोच अन्नपदार्थ उपलब्ध करून देणारी ॲप आधारित सेवा तसेच मिठाई उत्पादकांकडून करण्यात आलेल्या खरेदीवर दहा टक्के सूट देणारे कुपन भेट देण्यास सुरुवात झाली आहे. वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांकडून विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात येते. कारवाईच्या वेळी दुचाकीस्वार तसेच मोटारचालकाने नियमांचे पालन केल्याचे दिसून आल्यास तसेच त्याच्याकडे वाहनपरवाना असल्यास त्याला आभार योजनेअंतर्गत कुपन देण्यास सुरुवात झाली आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या संकल्पनेतून ही योजना राबविण्यात येत आहे. येरवडा वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश साठे या योजनेचे समन्वयक आहेत.

कारवाईच्या वेळी एखाद्या दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान केल्याचे किंवा मोटारचालकाने आसनपट्टा (सीटबेल्ट) लावल्याचे दिसून येते. संबंधित वाहनचालकाकडे परवाना असल्यास तसेच त्याच्याकडे दंडाची रक्कम प्रलंबित नसल्यास त्याला कुपन भेट देण्यात येते. गेल्या दोन महिन्यात शहरातील नियम पाळणाऱ्या १५ हजार १२ जणांना आभार कुपन भेट देण्यात आले आहे. नियम पाळणाऱ्या वाहनचालकांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबविण्यात आली आहे, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक साठे यांनी नमूद केले.

**आभार योजनेचे कुपन असे मिळते**

या योजनेसाठी वाहतूक पोलिसांनी खास ॲप तयार केले आहे. या योजनेत शहरातील १५० हून अधिक नामवंत व्यावसायिक, महादुकानातील (मॉल) व्यावसायिक सहभागी झाले आहेत. वाहनचालकाने नियमांचे पालन केल्याचे दिसून आल्यास त्याला एक क्रमांक ॲपद्वारे पाठविण्यात येतो. त्याच्या मोबाइलवर तो क्रमांक आल्यानंतर वाहनचालक वाहतूक पोलिसांच्या यादीतील ज्या व्यावसायिकाकडून खरेदी करेल, त्या खरेदीवर त्याला दहा टक्के सूट मिळते. कुपन भेट देण्यात आल्यानंतर साधारणपणे एक महिन्याच्या कालावधीत वाहनचालकाने खरेदी करणे आवश्यक आहे.

प्रभात – दि. १२ जुलै, २०१९

# वाहतूक पोलिसांनी केली ४८ वाहनांवर कारवाई

प्रभात वृत्तसेवा

**कात्रज, दि. ११ -** कात्रज चौक ते दत्तनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर बेशिस्त पार्किंग केलेल्या वाहनांवर व ट्रिपल सीट विना लायसन्स दुचाकी चालकांवर 'पीएमसी' ॲक्टद्वारे भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागाकडून कारवाई सुरू आहे. याअंतर्गत दोन दिवसांमध्ये ४८ वाहनांवर कारवाई करून ५५ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. या मार्गावर कायमच वाहतुकीचा प्रचंड ताण असून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यावर पोलिसांचा भर आहे.





# पोस्टाद्वारे आता ई-चलन थेट घरी

## वाहतूक विभाग घेणार पोस्ट खात्याची मदत

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४** - वाहतूक विभागाकडून करण्यात येणाऱ्या दंडाच्या कारवाईचे ई-चलन आता थेट पोस्ट खात्यामार्फत घरी पाठवण्यात येणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक शाखेने पोस्ट खात्याची मदत घेतली असून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये ही प्रक्रिया सुरू होणार असल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले.

शहरातील विविध भागांत वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांकडून ई-चलनाद्वारे दंडात्मक कारवाई केली जाते. यासाठी चौकाचौकात 'सीसीटीव्ही' बसवण्यात आले आहेत. 'सीसीटीव्ही'द्वारे कारवाई केल्यानंतर नाकाबंदीच्या माध्यमातून संबंधित वाहनावरील दंड वसूल केला जातो. सद्यस्थितीत वाहनचालकांवर कोट्यवधी रुपयांची थकबाकी झाली असून ती वसूल करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. यासाठी वाहतूक शाखेने आता पोस्ट खात्याची मदत घेतली आहे.

चलन मिळाल्यानंतर वाहनचालकाने जवळच्या वाहतूक शाखेत १० दिवसांच्या आत दंड भरण्याचे सांगण्यात आले आहे. अन्यथा चालकावर मोटार वाहन न्यायालयात खटला दाखल केला जाणार असल्याच्या स्पष्ट सूचना चलन प्रिंटवर देण्यात आल्या असल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले. ई-चलनाबाबत नागरिकांना काही शंका असल्यास त्यांनी जवळच्या वाहतूक शाखेत सकाळी १० ते ५ या वेळेत भेट द्यावी, असे आवाहन वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.

> “दंड लावण्यात आलेल्या वाहनाच्या नंबरवरून त्याची पूर्ण माहिती काढली जाणार असून त्याचे चलन करण्यात येणार आहे. या प्रिंटवर वाहनचालकाचा पत्ता, मोडलेला नियम, त्याचा फोटो, दंडाची रक्कम आदी माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. यानंतर हे चलन पोस्टमनद्वारे संबंधित वाहनचालकांच्या घरी पोहोचते केले जाणार आहे. त्यामुळे संबंधित वाहनचालकाने चलन मिळाल्यानंतर दंड भरून सहकार्य करावे.
>
> **– पंकज देशमुख,** पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

## शहर, जिल्ह्यातील १९७ महाविद्यालयांत वाहतूक समिती

# विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांकडून वाहतूक शिस्तीचे धडे!

**प्रतिनिधी, पुणे**

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना** वाहतूक शिस्तीचे धडे देण्यासाठी शहरातील विविध महाविद्यालयात वाहतूक समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) तसेच राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांचा समावेश असेल.

"वाहतूक नियम तसेच रस्ता सुरक्षेबाबत विविध महाविद्यालयात वाहतूक समिती स्थापन करण्यात येणार आहे. शहरातील विविध महाविद्यालयांकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. या समितीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समावेश असणार असून लवकरच पुणे शहर, जिल्हा आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध महाविद्यालयात वाहतूक समिती स्थापन करण्यात येणार आहे.

– **पंकज देशमुख**, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

वाहतूक पोलिसांकडून शहरातील विविध महाविद्यालयांत वाहतूक समिती स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. शहरातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. शहरातील वाहनांची संख्या ३८ लाखांच्या पुढे असून शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांना वाहतूक नियम तसेच शिस्तीचे धडे देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयात वाहतूक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आठवडाभरात शहरातील मॉडर्न महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मराठवाडा मित्र मंडळाचे महाविद्यालयासह आठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. येत्या दोन महिन्यात पुणे शहर, जिल्हा आणि पिंपरी-चिंचवड पसिरातील १९७ महाविद्यालयात वाहतूक समिती स्थापन करण्याबाबत प्रयत्न करण्यात येणार आहे. राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेमधील विद्यार्थ्यांचा या समितीत समावेश असेल. या समितीत १२ सदस्यांचा समावेश करण्यात येणार आहे. समितीतील विद्यार्थी अन्य विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालय परिसरातील महत्त्वाचे रस्ते, चौकात या समितीतील विद्यार्थ्यांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. वाहतूक समस्या सोडविण्यासाठी महाविद्यालयीन तरुणांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. वाहतूक शाखेतील पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक या उपक्रमाचे समन्वयक म्हणून काम करतील.

लोकमत – दि. २९ जुलै, २०१९

# वाहतूक शाखेचे 'पुणे ट्रॅफवॉच' नवे संकेतस्थळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाहनचालकांना शहरांतर्गत प्रवास करणे सोपे जावे व रस्त्यांची सद्यपरिस्थिती, पार्किंगची जागा, साइनबोर्ड याची माहिती मिळावी, या हेतूने वाहतूक शाखेने पुणे ट्रॅफवॉच नावाचे नवीन संकेतस्थळ सुरु केले आहे. संकेतस्थळामुळे वाहनचालकांना प्रवास करणे सुलभ होणार आहे.

पुणे शहर वाहतूक शाखा, चेंजभाई व स्मार्ट सिटीच्या संकल्पनेतून सुरु केलेल्या 'पुणे ट्रॅफवॉच' या संकेतस्थळाचे शनिवारी उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांच्यासह वाहतूक शाखेचे अधिकारी उपस्थित होते. संकेतस्थळासाठी चेंजभाई या संस्थेने विशेष काम केले आहे.

संकेतस्थळावर 'फोटो ऑटो टॅगिंग' असणारा देशातील हा पहिला प्रकल्प असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

## शहरातील 'ब्लॅकस्पॉट' एका क्लिकवर

सुरळीत वाहतुकीसाठी वाहतूक शाखेने शहरात विविध नियम ठरवून दिलेले आहेत. यात नो पार्किंग झोन, नो एन्ट्री, वन-वे मार्ग आदींचा समावेश असून याची सर्व अद्ययावत माहिती या संकेतस्थळावर अपडेट करण्यात आली आहे. यामध्ये ब्लॅकस्पॉटची माहिती असून एका क्लिकवर नागरिकांना ब्लॅकस्पॉटची यादी दिसणार आहे.

"पालखी मार्गाची माहिती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'वेबपेज'प्रमाणे 'पुणे ट्रॅफवॉच'ची संकल्पना राबविण्यात येणार आहे. 'पुणे ट्रॅफवॉच'वर 'रिअल टाइम अपडेट' असल्याने नागरिकांसाठी ही संकल्पना फायदेशीर ठरणार आहे. वाहनचालकांना या माध्यमातून रस्त्यावरची परिस्थिती पाहता येणार आहे.

– पंकज देशमुख,
पोलीस उपायुक्त, वाहतूक

लोकमत – दि. ०८ जुलै, २०१९

# नियम मोडल्यास होणार कारवाई

## स्कूलबसचालकांना पोलीस आयुक्तांचा आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त व जिल्हा स्कूलबस सुरक्षितता समितीचे अध्यक्ष डॉ. के. वेंकटेशम यांनी दिले आहेत. तसेच शाळेच्या वेळा व विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन वाहनतळ व वाहन थांबे निश्चित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

जिल्हा स्कूलबस सुरक्षितता समितीची या शैक्षणिक वर्षातील पहिली बैठक वेंकटेशम यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. बैठकीमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर, विनोद सगरे, संजय धायगुडे यांच्यासह पोलीस, शिक्षण, जिल्हा बस वाहतुक संघटनांचे सदस्य उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षामध्ये सर्व शाळा प्रशासन, स्कूलबसमालक यांनी विद्यार्थ्यांची वाहतूक अधिक सुरक्षितपणे करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याच्या सूचना बैठकीत दिल्या. प्रादेशिक परिवहन विभाग व वाहतूक पोलिसांनी नियमितपणे शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

### बैठकीत समित्यांचा आढावा




- शिक्षण विभागाकडून दि. ३१ जुलैपूर्वी शहर व जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परिवहन समित्या स्थापन झाल्या व बैठका घेण्यात आला याचा आढावा घेतला जाणार आहे. सर्व मुख्याध्यापकांना बस कंत्राटासोबत परस्पर सामंजस्य करार करण्याबाबत सांगण्यात आले आहे.
- मात्र अनेक शाळा व्यवस्थापन याबाबत उदासीन असल्याचे दिसून येत आहे. असे करार किती शाळांनी केले, याबाबतही अहवाल सादर करण्याच्या सूचना शिक्षण विभागाला देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत मुख्याध्यापक, बसचालक, मालक, सहायक यांच्यासाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर व ग्रामीण भागांमध्ये कार्यशाळा घेतल्या जाव्यात, असेही आयुक्तांनी सूचित केले आहे.